# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
## अधिसूचना

**विद्युत अधिनियम, २००३**

**क्र.मविनिआ/तांत्रिक/विनियम/---** - विद्युत अधिनियम, २००३ च्या (२००३ चा ३६) कलम ६१ आणि कलम ८६(३) सह कलम १८१ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि वीज दर धोरण, २०१६ च्या खंड ५.३ च्या अनुषंगाने तसेच या संबंधात त्यास समर्थ करणाऱ्या अन्य सर्व अधिकारांचा वापर करुन आणि पूर्व प्रसिध्दीनंतर, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग 'महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्रीडला जोडलेली परस्पर-सक्रीय छपरावरील नूतनशील ऊर्जा निर्मिती यंत्रणा) विनियम, २०१९' (**'मुख्य विनियम'**) सह 'महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्रीडला जोडलेली परस्पर-सक्रीय छपरावरील नूतनशील ऊर्जा निर्मिती यंत्रणा)(पहिली सुधारणा) विनियम, २०२४' या विनियमांमध्ये सुधारणा करण्यासाठी खालील विनियम करीत आहे :

### १. संक्षिप्त शीर्षक आणि प्रारंभ

२.१ या विनियमांना ''महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्रीडला जोडलेली परस्पर-सक्रीय छपरावरील नूतनशील ऊर्जा निर्मिती यंत्रणा) (दुसरी सुधारणा) विनियम, २०२४'' असे म्हणावे.

२.२ हे विनियम शासकीय राजपत्रातील त्यांच्या प्रसिध्दीच्या दिनांकापासून अंमलात येतील.

### २. मुख्य विनियमांच्या विनियम २ मध्ये सुधारणा:-

**मुख्य विनियमांच्या विनियम २.१(जे) मध्ये चौथ्या आणि पाचव्या परंतुकांची भर:-**

''परंतु आणखी असे की, निवासी ग्राहक एकाच वितरण परवानाधारकाच्या क्षेत्रात स्थित असलेल्या कोणत्याही ठिकाणी नूतनशील ऊर्जा निर्मिती यंत्रणा बसवू शकतात आणि अशा संयत्रामधून निर्माण झालेली नूतनशील ऊर्जा व्हर्च्युअल नक्त मापन व्यवस्थे अंतर्गत प्राप्त करु शकतात.

परंतु असेही की, गृहनिर्माण सोसायटीच्या सामायिक जोडणीसह अनेक निवासी ग्राहक एकत्र येऊ शकतात आणि अशा नूतनशील ऊर्जा निर्मिती यंत्रणेची एकूण क्षमता प्रत्येक सहभागी ग्राहकाच्या पात्र क्षमतेच्या बेरजेपेक्षा अधिक असणार नाही या अटीच्या अधीन राहून, सामायिक ठिकाणी व्हर्च्युअल नक्त मापन व्यवस्थे अंतर्गत नूतनशील ऊर्जा निर्मिती यंत्रणा बसवू शकतात.''

**मुख्य विनियमांच्या विनियम २.१(झेड) नंतर २.१(झेड)(ए) ची भर:-**

"२.१(झेड)(ए) **"व्हर्च्युअल नक्त मापन"** म्हणजे अशी पध्दत ज्यामध्ये नूतनशील उर्जा निर्मिती यंत्रणेद्वारे निर्माण झालेली संपूर्ण वीज नूतनशील ऊर्जा मीटर किंवा सकल मीटरद्वारे ग्रिडमध्ये निर्यात केली जाते आणि निर्यात केलेली ऊर्जा एकाच वितरण परवानाधारकाच्या क्षेत्रातील गृहनिर्माण सोसायटीच्या सामायिक जोडणीसह एका किंवा एकापेक्षा जास्त सहभागी निवासी ग्राहकांमध्ये समायोजित करण्यात येते."

**३ मुख्य विनियमांच्या भाग अ - सर्वसाधारण मधील विनियम ४ मध्ये सुधारणा:**

**मुख्य विनियमांच्या विनियम ४.३ नंतर विनियम ४.४ ची भर:-**

"४.४ व्हर्च्युअल नक्त मापन व्यवस्थे अंतर्गत बसवलेल्या नूतनशील ऊर्जा निर्मिती यंत्रणेची ग्रीडशी जोडणीयता आणि काल व परिमाण निर्धारण (शेड्युलिंग) आयोगाच्या संबंधित विनियमांद्वारे करण्यात येईल."

**४. मुख्य विनियमांच्या भाग ब - तांत्रिक व्यवस्था मधील विनियम ८ आणि ९ मध्ये सुधारणा:-**

**मुख्य विनियमांच्या विनियम ८.११ मध्ये खालीलप्रमाणे बदल :-**

"८.११ सकल मीटर व्यवस्था आणि व्हर्च्युअल नक्त मापन व्यवस्थे अंतर्गत बसविण्यात आलेल्या नूतनशील ऊर्जा निर्मिती यंत्रणेच्या बाबतीत, वितरण परवानाधारकाकडून नूतनशील ऊर्जा निर्मिती मीटरसाठी यथोचित श्रेणीचा अतिरिक्त मीटर बसविण्यात येईल."

**मुख्य विनियमांच्या विनियम ९.७ मध्ये खालीलप्रमाणे बदल:-**

"९.७ एखाद्या विशिष्ट रोहित्रावर नूतनशील ऊर्जा निर्मिती यंत्रणा बसविण्यासाठीचा कोणताही अर्ज नाकारण्यापूर्वी, वितरण परवानाधारक ग्राहकाच्या कक्षेतील त्रुटी दुरुस्त करण्यासाठी १५ दिवसांची किंवा त्रुटी काढून टाकण्यासाठी आवश्यक असलेल्या जास्त कालावधीची नोटीस देईल.

परंतु असे की, अर्ज ज्येष्ठताक्रमानुसार विचारात घेण्यात यावेत."

**मुख्य विनियमांच्या विनियम ९.७ नंतर विनियम ९.७ (ए) ची खालीलप्रमाणे भर :-**

"९.७(ए) व्यवहार्यता अभ्यास किंवा अर्ज स्वीकारण्यापासून ते यंत्रणा बसविण्याच्या कालावधीदरम्यान, जर आवश्यक क्षमतेची छपरावरील सौर फोटो व्होल्टॅक यंत्रणा बसविण्यासाठी सेवा वाहिनीत वाढ करण्याची, वितरण रोहित्र क्षमते वाढ करण्याची आणि तत्सम वितरण पायाभूत सुविधा अद्ययावत करण्याची

आवश्यकता असल्यास, वितरण परवानाधारकाद्वारे वेळोवेळी सुधारण करण्यात आलेल्या महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता, वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके आणि पॉवर क्वालिटी) विनियम, २०२१ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेचे पालन करुन ते केले जाईल.

परंतु असे की, छपरावरील सौर फोटो व्होल्टॅक यंत्रणा बसविण्यास चालना देण्याकरिता वितरण पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणाचा खर्च, वितरण रोहित्रासह, आवश्यक असल्यास, वितरण परवानाधारकाच्या वार्षिक महसुली गरजेमध्ये समाविष्ट करण्यात येईल.''

**५. मुख्य विनियमांच्या भाग क - वाणिज्यिक व्यवस्था मधील विनियम ११ मध्ये सुधारणा:**

**मुख्य विनियमांच्या विनियम ११.९ नंतर विनियम ११.१० ची खालीलप्रमाणे भर:-**

**११.१० व्हर्च्युअल नक्त मापन - ऊर्जा लेखे आणि हिशोबपूर्ती**

''(ए) नूतनशील ऊर्जा निर्मिती यंत्रणेद्वारे निर्माण केलेली ऊर्जा, एकाच वितरण परवानाधारकाच्या क्षेत्रातील गृहनिर्माण सोसायटीच्या सामायिक जोडणीसह प्रत्येक सहभागी निवासी ग्राहकाच्या मासिक वीज देयकामध्ये, नूतनशील ऊर्जा निर्मिती यंत्रणेमधून वीज प्राप्त करण्याबाबत ग्राहकांशी केलेल्या करारात दर्शविलेल्या गुणोत्तरानुसार, जमा करण्यात येईल.

परंतु असे की, अशा गुणोत्तराच्या आधारावर सहभागी ग्राहकांना उपलब्ध होणारी नूतनशील ऊर्जा निर्मिती यंत्रणेची क्षमता नक्त मापन व्यवस्थेअंतर्गत अशा ग्राहकाला पात्र असलेल्या क्षमतेपेक्षा जास्त असणार नाही.

परंतु आणखी असे की, वितरण परवानाधारकाला दोन महिन्यांची आगाऊ नोटीस देऊन आर्थिक वर्षामध्ये एकदा वीजप्राप्तीच्या गुणोत्तरामध्ये बदल करण्याचा पर्याय सहभागी ग्राहकांकडे असेल.

बी) कोणत्याही काल-गटामधील (उदा. सर्वोच्च मागणीचे (पीक) तास, ऑफ-पीक तास इ.) विजेचा वापर प्रथम सहभागी ग्राहकांच्या समान देयक चक्रामधील समान काल-गटामध्ये भरुन काढण्यात येईल. देयक चक्रातील कोणत्याही काल-गटामध्ये वीज वापरापेक्षा जास्त झालेल्या वीज निर्मितीचा हिशोब टाईम-ऑफ-डे (टीओडी) ग्राहकांसाठी ऑफ-पीक काल-गटा दरम्यान आणि नॉन-टीओडी ग्राहकांसाठी सामान्य काल-गटा दरम्यान केलेली अतिरिक्त निर्मिती/ ऊर्जा क्रेडीट म्हणून ठेवण्यात येईल.

सी) कोणत्याही सहभागी ग्राहकाच्या कोणत्याही देयक कालावधी दरम्यान जमा (क्रेडीट) करण्यात आलेले युनिट्स त्या ग्राहकाने आयात केलेल्या युनिटपेक्षा जास्त

असतात तेव्हा, असे जमा केलेले अतिरिक्त युनिट्स अशा सहभागी ग्राहकांसाठी ऊर्जा क्रेडीट्स म्हणून पुढील देयक कालावधीत ओढण्यात येतील.

डी) प्रत्येक आर्थिक वर्षाच्या शेवटी जमा (क्रेडीट) केलेल्या विजेच्या नक्त असमायोजित युनिट्ससाठी, प्रत्येक सहभागी ग्राहकाला खंड ११.४ (सी) च्या तरतुदी लागू राहतील.

इ) महाराष्ट्रामध्ये छपरावरील सौर ऊर्जा निर्मितीची स्थापित क्षमता ५००० मेगावॅटपर्यंत पोहोचेपर्यंत नूतनशील ऊर्जा निर्मिती यंत्रणेद्वारे वीज प्राप्त करण्यासाठीचा मुक्त प्रवेश आकार आणि तोटा लागू करण्यामधून सूट देण्यात येते.”

**६. मुख्य विनियमांच्या परिशिष्ट - १ चा खंड सी खालीलप्रमाणे बदलण्यात येतो :**

**मुख्य विनियमांच्या परिशिष्ट - १ चा खंड सी मध्ये खालीलप्रमाणे बदल :**

“सी. नूतनशील ऊर्जा निर्मिती यंत्रणा बसविण्यासाठी पंधरा (१५) दिवसांच्या आत तांत्रिक व्यवहार्यता अभ्यास पूर्ण करण्यात येईल आणि या अभ्यासामधील निष्कर्ष अर्जदाराला कळविण्यात येतील, असे न झाल्यास प्रस्ताव तांत्रिकदृष्ट्या व्यवहार्य असल्याचे गृहित धरण्यात येईल.

परंतु असे की, १० केडब्ल्यु पर्यंतच्या नूतनशील ऊर्जा निर्मिती यंत्रणेसाठीचे अर्ज, सर्व दृष्टीने परिपूर्ण असलेले, तांत्रिक व्यवहार्यता अभ्यासाच्या आवश्यकतेशिवाय स्वीकारण्यात आल्याचे मानण्यात येईल आणि ग्राहकाच्या मंजूर भाराच्या अनुरुप कोणतीही वाढ, आवश्यक असल्याप्रमाणे, वितरण परवानाधारकाकडून करण्यात येईल.”

**मुख्य विनियमांच्या परिशिष्ट - १ चा खंड एच नंतर खंड आय ची खालीलप्रमाणे भर:**

“आय. नक्त मापन/नक्त देयक/सकल मापन जोडणी कराराचा नमुना वितरण परवानाधारकाच्या वेब-पोर्टलवर ठेवण्यात येईल.”

**मुख्य विनियमांच्या परिशिष्ट - ३ मध्ये सुधारणा**

**मुख्य विनियमांच्या परिशिष्ट -३ च्या खंड ८.६ नंतर खंड ८.७ ची खालीलप्रमाणे भर:**

“८.७ (ए) व्हर्च्युअल नक्त मापनाच्या बाबतीत, नूतनशील ऊर्जा निर्मिती यंत्रणेद्वारे निर्माण केलेली वीज खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे वीज प्राप्तीच्या गुणोत्तरानुसार गृहनिर्माण सोसायटीच्या सामायिक जोडणीसह प्रत्येक सहभागी निवासी ग्राहकाच्या मासिक विद्युत देयकामध्ये जमा करण्यात येईल:

| अनु. क्र. | ग्राहकाचे नाव (प्राथमिक जोडणीपासून प्रारंभ) | ग्राहक क्र. | सहभागितेचे गुणोत्तर (%) |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |

(बी) वितरण परवानाधारकाला दोन महिन्यांची आगाऊ नोटीस देऊन आर्थिक वर्षामध्ये एकदा वीजप्राप्तीच्या गुणोत्तरामध्ये बदल करण्याचा पर्याय सहभागी ग्राहकांकडे असेल.

(सी) कोणत्याही काल-गटामधील (उदा. सर्वोच्च मागणीचे (पीक) तास, ऑफ-पीक तास इ.) विजेचा वापर प्रथम सहभागी ग्राहकांच्या समान देयक चक्रामधील समान काल-गटामध्ये भरुन काढण्यात येईल. देयक चक्रातील कोणत्याही काल-गटामध्ये वीज वापरापेक्षा जास्त झालेल्या वीज निर्मितीचा हिशोब टाईम-ऑफ-डे (टीओडी) ग्राहकांसाठी ऑफ-पीक काल-गटा दरम्यान आणि नॉन-टीओडी ग्राहकांसाठी सामान्य काल-गटा दरम्यान केलेली अतिरिक्त निर्मिती/ ऊर्जा क्रेडीट म्हणून ठेवण्यात येईल.

(डी) कोणत्याही सहभागी ग्राहकाच्या कोणत्याही देयक कालावधीदरम्यान जमा (क्रेडीट) करण्यात आलेले युनिट्स त्या ग्राहकाने आयात केलेल्या युनिटपेक्षा जास्त असतात तेव्हा, असे जमा केलेले अतिरिक्त युनिट्स अशा सहभागी ग्राहकांसाठी ऊर्जा क्रेडीट्स म्हणून पुढील देयक कालावधीत ओढण्यात येतील.

(इ) प्रत्येक आर्थिक वर्षाच्या शेवटी जमा (क्रेडीट्) केलेल्या विजेच्या नक्त असमायोजित युनिट्ससाठी, प्रत्येक सहभागी ग्राहकाला खंड ११.४ (सी) च्या तरतुदी लागू राहतील.

(एफ) महाराष्ट्रामध्ये छपरावरील सौर ऊर्जा निर्मितीची स्थापित क्षमता ५००० मेगावॅटपर्यंत पोहोचेपर्यंत नूतनशील ऊर्जा निर्मिती यंत्रणेद्वारे वीज प्राप्त करण्यासाठीचा मुक्त प्रवेश आकार आणि तोटा लागू करण्यामधून सूट देण्यात येते.”

मुंबई,
दिनांक : -- मे, २०२४

**(डॉ. राजेंद्र गं. आंबेकर)**
सचिव,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग